"जनहितार्थ सर्वदा"

# महाराष्ट्र शासन

उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२

**दूरध्वनी क्र : ०२२-२२८१-०३८६** **Email: labour7.ield-mh@nic.in**

---

क्रमांक : इबांका-०७२५/प्र.क्र.१०२/काम-७ दिनांक : १३ ऑगस्ट, २०२५

प्रति,

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
महाराष्ट्र इमारत व इतर कामगार कल्याणकारी मंडळ,
एमएमटीसी बिल्डींग, ई-ब्लॉक, सी-२२,वांद्रे-कुर्ला संकुल,
वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०००५१.

**विषय**:- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळामार्फत गंभीर आजाराच्या उपचारार्थ रु.१ लक्ष अर्थसहाय्य आणि प्रसुती लाभाकरीता देण्यात येणारे अर्थसहाय्य या योजना बंद करण्याबाबत

**संदर्भ** :- सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांचे पत्र क्र.१४८९-अ/२०२५/आरोग्य-२०२५/प्र.क्र.११६/यो-०६/२०२५, दिनांक १४.०७.२०२५

महोदय,

विषयाधीन प्रकरणी महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळांतर्गत नोंदीत बांधकाम कामगारांकरीता राबविण्यात येत असलेल्या कल्याणकारी योजनांपैकी गंभीर आजाराच्या उपचारार्थ रु.१ लक्ष अर्थसहाय्य आणि प्रसुती लाभाकरीता देण्यात येणारे अर्थसहाय्य (नैसर्गिक प्रसुतीसाठी रु.१५,०००/- आणि शस्त्रक्रियेद्वारे प्रसुतीसाठी रु.२०,०००/- एवढे आर्थिक सहाय्य) या दोन आरोग्य विषयक योजना बंद करण्याबाबतचा प्रस्ताव मा.मंत्री (कामगार) तथा अध्यक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांच्या शिफारशीसह मंडळाने शासनास मान्यतेस्तव सादर केला आहे.

२. त्यास अनुसरुन सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांनी त्यांच्या दिनांक १४.०७.२०२५ रोजीच्या पत्रान्वये सादर केलेल्या प्रस्तावास शासन मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

३. विषयाधीन प्रकरणी दिलेल्या शासन मान्यतेस अनुसरुन पुढील आवश्यक ती कार्यवाही सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांच्या स्तरावरुन करण्यात यावी.

आपली,

(सगुणा काळे-ठेंगील)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत:- निवडनस्ती (कामगार-७)

C:\ASO Amit\ASO Amit (Labour-७)\२०२५\CR 2025\CR-102-0725 आरोग्याच्या योजना (गंभीर आजार व प्रसुती लाभ) बंद करण्याबाबत प्रस्ताव..docx/१